# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. २५६५१४३ फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

E-mail : ronagpur.dte@gmail.com Website : rdtenagpur.org.in

कालमर्यादित

इमेलव्दारे/सकंतस्थळावर

क्रमांक : तंशिस/प्राकाना/शै.वि/इ.बी.सी/२०१३/3229

दिनांक : 23 SEP 2013

प्रति,

प्राचार्य/संचालक,

______________________

______________________

(सर्व अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्था, एमबीए / एमसीए पदव्युत्तर पदवी, हॉटेल मॅनेजमेंट पदवी / पदवीका संस्था)

विषयः— **खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थेमध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क ५० टक्के प्रतिपुर्तीबाबत (संगणक प्रणाली व्दारे ऑनलाईन अर्ज भरुन घेणेबाबत). शैक्षणिक वर्ष २०१३–१४**

संदर्भः— तंशिसं, म.रा., मंबई यांचे पत्र क्र.१५/अर्थस/ईबीसी/ऑनलाईन/२०१३/१०९, दि. २०/०९/२०१३

शैक्षणिक वर्ष २०१३–१४ पासून खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थेमध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क ५० टक्के प्रतिपुर्ती योजनेची अंमलबजावणी (ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर करण्यात येणार असून त्याबाबतची माहिती संस्थांनी भरावयाची आहे.

त्याकरीता आपल्या संस्थेत प्रवेशीत ई.बी.सी. करीता पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज योग्य त्या कागदपत्रासह (जसे कॅप व्दारे प्रवेशित विद्यार्थी असल्याबाबतचा प्रवेश निच्छीत केल्याचे पत्र, आर्थिक वर्ष २०१२–१३ चा सक्षम प्राधिका–याकडून प्राप्त केलेला उत्पनाचा दाखला, अधिवासी प्रमाणपत्र, अपत्य प्रमाणपत्र जसे राशन कार्ड इत्यादी) विद्यार्थ्यांकडून प्राप्त करुन घ्यावे. **त्याबाबतचे जाहीर प्रगटन/परिपत्रक आपल्या संस्थेने सुचना फलकावर ठळक पध्दतीने दयावी तसेच सदरची सुचना वर्गामध्ये शिक्षकांमार्फत दयावी.**

उपरोक्त योजनेची माहिती ऑनलाईन संगणक प्रणालीवर भरण्याकरीता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी **अंतिम दि. ०३ ऑक्टोबर २०१३ ठरवून** दिलेली आहे.

सदर योजनेकरीता **कोणताही पात्र विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता संस्था प्रमुख या नात्याने प्राचार्य** यांनी घ्यावी. विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित राहिल्यास व त्याबाबत काही प्रकरण उद्‌भवल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख प्राचार्य यांची राहिल याबाबतची गंभिर नोंद घ्यावी.

सदर योजनेकरीता विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीच्या वापराच्या अनुषंगाने आपणास उद्‌भणा–या अडीअडचणी चे निराकरण करण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथील **श्रीमती व्ही.ए. चाटे, सिस्टिम ॲनालिस्ट यांनी समन्वयक म्हणून नियुक्त करण्यात आली आहे. आपणास काही अडचणी उद्‌भवल्यास systemanalyst.dte@gmail.com या ईमेल व दुरध्वनी क्र. ०२२–३०२३३४६८** वर संपर्क साधावा.

सुलभ संदर्भाकरीता सोबत तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संदर्भिय पत्र जोडलेले आहे.

सोबतः— वरीलप्रमाणे संदर्भिय पत्र

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर.

प्रतः— प्रोग्रामर, हेच कार्यालय यांना वेबसाईडवर अपलोड करण्याकरीता

D:\EBC\EBC-2013-14 Main Folder\EBC General Letter.doc

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७

तार EDUTECE-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in


क्रमांकः१५/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन/२०१३/१०८
दिनांक : 20 SEP 2013

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत (संगणक प्रणाली द्वारे ऑनलाईन अर्ज भरून घेणे )

खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टयास मागास विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यासाठी (ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर संस्थांनी माहिती भरावयाची आहे. त्यासाठी सर्व विदयार्थ्यांचे अर्ज व आवश्यक ती कागदपत्रे संस्थेनी उपलब्ध करुन घ्यावयाची आहे. याबाबतचे जाहीर प्रगटन/ परिपत्रक संबंधित संस्थानी सूचना फलकावर ठळक प्रसिध्दी दयावी तसेच सदरची सूचना वर्गामध्ये शिक्षकामार्फत दयावी. संस्थेमधील कोणताही विदयार्थी योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता संबंधित संस्थेच्या प्राचार्यानी घ्यावी .विदयार्थी या योजनेपासून वंचित राहिल्यास याची सर्वश्री जबाबदारी संस्थाप्रमुख प्राचार्य यांची राहिल. अशा सक्त सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

उपरोक्त योजनेची माहिती ऑनलाईन संगणक प्रणालीवर संस्थांनी अंतिम दि. ०३ ऑक्टोबर २०१३ पर्यंत भरण्याबाबत सूचना सर्व संबंधित संस्थांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

उपरोक्त योजनेसाठी विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीच्या वापराच्या अनुषंगाने विभागीय कार्यालये /अधिनस्त संस्थांना उद्‌भवणा-या अडीअडचणी इत्यादीबाबतचे निराकरण करण्यासाठी श्रीमती व्ही.ए.चाटे, सिस्टिम ॲनालिस्ट, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतीत काही अडीअडचणी उद्‌भवल्यास systemanalyst.dte@gmail.com या ईमेल व दूरध्वनी क्र.०२२/३०२३३४६८ वर संपर्क साधावा.

( डॉ. सुभाष महाजन )
प्र. संचालक
तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

\\192.168.1.9\Desk15\Kadam EBC 2012-13\ebc letter ro.doc